# ‘साहित्य ई-बुक ’ चे रविवारी प्रकाशन



साठच्या दशकात प्रसिद्ध झालेल्या ‘कोसला'पासून गेल्या वर्षीच्या ‘हिंदू- जगण्याची समृद्ध अडगळ'पर्यंत विविध साहित्य रचनांनी केवळ मराठीच नव्हे तर भारतीय साहित्यात स्वत:चे आगळे स्थान निर्माण करणाऱ्या डॉ. भालचंद्र नेमाडे यांचे समग्र साहित्य बुकगंगा डॉट कॉम या संस्थेने ई-बुक स्वरूपात उपलब्ध करून दिले असून या ई-आवृत्तीचे प्रकाशन रविवार २८ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ७ वाजता प्रभादेवी येथील रविंद्र नाटय़मंदिरातील पु.ल. देशपांडे कला अकादमीच्या सभागृहात मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्या हस्ते होणार आहे. पन्नास वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेली ‘कोसला' इंग्रजी, हिंदी, बंगाली, पंजाबी, आसामी, उर्दू आणि ओरियामध्ये भाषांतरीत झालेली आहे. त्यानंतरच्या बिढार, जरीला, झूल आणि हूल या कादंबऱ्याही वाचकप्रिय ठरल्या. त्यांचे हिंदूसहीत सर्वच साहित्य आता ई-बुक स्वरूपात मिळणार आहे.